# ६ . हंशा

काय मित्रांनो नाव वाचून दचकलात ना ? कि बुचकळयात पडलात ? असो मी तुम्हाला फार काळ अशा अवस्थेत ठेवू इच्छित नाही .

हंशा म्हणजे माझ्या आवडीच्या बैलाचे नाव . बघा परत बुचकळषात पडलात ना ? कि मी शेती कधी करायला लागलो ? ही माझ्या बालपणीची गोष्ट आहे व ती याच वेळी आठवायला निमित्त सुध्दा तसेच झाले आहे . प्रथम हंशाची गोष्ट .

कोणे एके काळी सगळयांना गावं असते तसे मलाही गावं होते . आता नाही म्हणजे तेथे कोणी कायम रहात नाही .
मी शेवटचा ऑक्टोंबर,नोव्हेंबर १९६७दिवाळीच्या सुटट्रीत गावी गेलो होतो . पण या हंशाच्या गोष्टीला सुरूवात झाली १९६१ साली . दर दोन वर्षानी माझे दादा (पिताश्री) आम्हा सर्वांना घेऊन गावाला जात असत . आमचे गावं आंबेरे खुर्द जयगड खाडीत वसलेले आहे .

सकाळी १० वाजता निघालेली बोट रात्री आठ वाजता जयगडला पोचायची . भर समुद्रात उभी रहायची व बोटीच्या तळमजल्यावरून मोठया तराफ्यात उडी मारावी लागे . १० खलाशी वल्ही मारून तराफा किनाऱ्यावर आणीत . रात्री तेथेच बंदरावर मुक्काम करून सकाळी लॉंचने ६ वाजता निघून १० वाजता गावाच्या किनाऱ्यावर उतरावे लागे . मग मलबारहिल एवढा डोंगर चढून डोंगरमाथ्यावरील घरात पोचेपर्यत ११ वाजत . बरोबर २४-२५ तासांचा प्रवास . खाडी एवढी प्रचंड की लॉंचला शेवटचे बंदर यायला दुपारचे १२ . ३० वाजत . खाडी कसली समुद्रच तो . गावचा अर्धा डोंगर चढल्यानंतर खाडीचे दृष्य इतके अप्रतिम दिसे की मी आजही डोळे बंद करून ते दृष्य बघू शकतो .

त्यानंतरच्या आयुष्यात अनेक वेळा निसर्गाची बरीच फोटोग्राफी केली पण ती जूनी मजा नाही . त्या काळी बॉक्स कॅमेराने त्या खाडीचा फोटो काढून मोठा करून पुण्याच्या काकांना त्यांच्या बंगल्याच्या हॉलमध्ये लावायला दिलेला आठवतोय .

काही वेळा कोकणातील काका जयगडला लहान शिडाची होडी पाठवीत . मग आम्ही रात्री ९ ते १२ पर्यत शिडाच्या होडीत निरव शांततेत चंद्र व चांदण्यांच्या प्रकाशात प्रवास करत असू . रात्री बंदरावरच्या दुकानात झोपून सकाळी सुर्योदयाला डोंगर चढत असू .

मित्रांनो चक्रावलात ना? गोष्ट हंशाची का गावाची ?पण काय करू हंशाबद्यल बोलायचं तर गावाबद्यल बोलावेच लागेल ना !!

१९६१ च्या दिवाळीच्या सुट्टीत आम्ही सर्व जण कोकणात गेलो. आमच्या घरी बरीच गुरे(गाई,बैल,म्हशी वगैरे)होती. त्या महिन्यातच आमची गाभण गाय व्यायली व तिने एका बछडयाला जन्म दिला. रंग काळाभोर व कपाळावर पांढरा गोल ठिपका. आम्ही त्याचे नाव हंशा ठेवले... त्याची आई इतकी गरीब होती ती आम्हाला हंशाला हात लावू देत होती. एक आठवडयानंतर आम्ही दाव्याला बांधून हंशाला गोठयामागील मोकळया बागेत फिरायला नेले. जसे काही हंशा म्हणजे कुत्राच होता. हंशाने एका हिसक्या सरशी दावे आमच्या हातातून सोडवून घेतले व पुढचे पाय पुढे व मागचे मागे अशा प्रचंड आनंदात नाचायला सुरूवात केली. आम्ही काकूला बोलावले व तिने चटकन् हंशाला पकडून त्याच्या आईजवळ बांधले. तेव्हा पासून आम्ही हंशाला फिरायला नेण्याचा कार्यक्रम तहकूब केला. पण हंशाला आमचा एवढा लळा लागला होता की आम्ही त्याच्याबरोबर ढुशी ढुशी खेळायचो.

दिवसामागून दिवस गेले. आमचा मुंबईला जायचा दिवस उगवला. हंशाच्या गळयात पडून आम्ही सर्वजण रडलो. हंशाच्या डोळयातही आम्हाला अश्रू दिसले. हंशाने आम्हाला चाटले व प्रेम केले.

मुंबईला परतल्यानंतर अभ्यास सुरू झाला. परंतू हंशाच्या आठवणी आमच्या बोलण्यात येत असत. पत्रातून हंशाची चौकशी. दोन वर्ष गेली. हंशाचे रूपांतर एका मस्तवाल खोडात/बैलात झाले होते.

लहानपणीच आमच्या बरोबर ढुशी ढुशी खेळल्यामुळे तो नेहमी टक्कर देण्याच्या तयारीत असे. हंशाची शिंगे मागील बाजूस वळलेली होती त्यामुळे त्याला कपाळानेच टक्कर द्यावी लागे. एका गरीब गाईचा मस्तवाल हंशा बघून आश्चर्य वाटे.

आता हंशाला इतर गुरांबरोबर रानात चरायला सोडणे शक्य नव्हते कारण हंशा कोणाच्याही मागे लागायचा व स्वतःचे बळ सिध्द् करायला तत्पर असायचा. आजकाल अमेरीका जसे वागते त्याच वागणूकीची झलक हंशाच्या वर्तणूकीत होती.

त्यामुळेच त्याला सांभाळायला एक गुराखी ठेवला होता. त्याची रवानगी बंदरावरील आमच्या दुकानामागील गोठयात करण्यात आली. त्याचे खायचे लाड अर्थातच सुरू होते. त्याच्यासाठी चांगला खुराक ,पेंड ,हिरवा चारा याची सोय असे. काकांची शेती होती. हंशाला स्पर्धेसाठी तयार करावयाचा नव्हता. पण हंशा स्वतःला नांगराला जुंपूनच घेईना. त्याच्या मते त्याचा जन्म काय नांगरणी करण्यासाठी होता?त्याचा जन्म तर खाऊन पिऊन लोळून मस्तवाल आयुष्य जगण्यासाठी होता. काळाच्या ओघात हंशा मार्गी लागला.
परंतु आश्र्चर्य एक गोष्टीचे वाटते कि ज्याच्या जन्मानंतर ६३.६५.६७ साली जेव्हा जेव्हा मी गावाला गेलो तेव्हा तो ओळख विसरला नव्हता. गेल्या जन्मी हंशा कुत्रा असेल का ?

१९६७ नंतर मी गावाला फिरकलोच नाही कारण वडिलच १९६९ मध्ये वारले. पुढे हंशा किती वर्षे जगला काहीच माहीत नाही. माझ्या मनात तो आजही तरूण आहे. आता ह्या हंशाच्या आठवणी व्हायचे कारण ?

गोष्टीला परत एक वळण.

माझा नातू २ वर्षांचा झाला. लहानपणापासून अतिशय मस्तीखोर. एका जागी जराही खेळणार नाही. प्रचंड उत्सुकता. मन फार काळ एक खेळात रमत नाही. लागेल याची पर्वा नाही. खेळताना दुखापतीची फिकीर नाही. असा हा नातू परवा लोखंडाच्या Bed वर उशीवरून उडया मारत होता. एक उडी चुकली व कपाळ लोखंडावर जबर आपटले. वेळ रात्रीची होती. दोन तासानी २-३ उलटया झाल्या. सकाळी शाळेत गेला. बाहेरून टेंगुळ दिसत नव्हते. दुस-या दिवशी १२ वाजता डॉक्टरकडे गेल्यावर त्याने X Ray काढला. टेंगुळ आतील बाजुस आले होते. गोळया, औषधे सुरू झाली. नातू मजेत आहे. त्याला सांभाळणे म्हणजे माझ्या मुलीची कसोटीच असते. (कसोटी जिंदगीची)

आमच्याकडे आला की कोणीतरी त्याच्या बरोबर सदैव असतो. त्यामुळे त्याला खूपच मजा येते. तरीही नजर चूकवून संगणकाचे बटण चालू करायला जातो. त्याच्या ह्या बाललिलांनी मला परवा चटकन माझ्या हंशाची आठवण झाली. (त्याला संभाळायला एक गुराखी नव्हे ! नव्हे ! एक नोकरच ठेवावा लागेल)

आपले मन म्हणजे सुरक्षित जमा कक्षा असतो. कधी तो कक्ष उघडेल व आठवणी फेर धरून नाचतील त्याचा नेम नाही.

काय मित्राने आवडली का गोष्ट ?
माझ्या हंशाची, गावाची व नातवाची ?